पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 MAR 2018

# समाजसुधारकांनी नवराष्ट्राची केलेली मांडणी महत्त्वाची : दत्ता देसाई

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शस्त्रास्त्रांचा उठाव करून देशाचे भवितव्य घडवावे, असा एक क्रांतिकारकांचा प्रवाह होता. दुसऱ्या एका प्रवाहामध्ये समाजसुधारकांनी दिलेले योगदान या संकल्पनेतून नवराष्ट्राची मांडणी केली. ती मांडणी अत्यंत मूलभूत होती, असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दत्ता देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि नेहरु अभ्यास केंद्र यांच्या वतीने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये शहिद दिनानिमित्त 'भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि आयडिया ऑफ इंडिया' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून देसाई बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या. परिसंवादाचे उद्घाटन डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते झाले. परिसंवादाची सुरुवात शहीद भगतसिंग, शहीद राजगुरू, शहीद सुखदेव यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

देसाई पुढे म्हणाले, राष्ट्र ही एक संकल्पना काल्पनिक नव्हे तर कल्पिक जनसमुदाय आहे. राष्ट्र नावाच्या संकल्पनेमध्ये माणसांनी एकत्र येणे ही आधुनिक घडामोड आहे. १७५७ प्लासीची लढाई, १८ व्या शतकामधील संन्यासांचे बंड, १९४५ च्या आरमारांचा उठाव इथपर्यंत भारत देशाला एक मोठी परंपरा आहे. भारत ही गोष्टघडून पूर्ण झालेली आहे. तिची आता जडण घडण होत आहे. १९२०-३० मध्ये पंचवीस ते तीस तरुणांनी देशाच्या राजकारणाला जी कलाटणी दिली. तिचे भारताच्या संकल्पना घडविण्यामध्ये फार मोठे योगदान होते. शहीद भगतसिंग आणि त्यांच्या क्रांतिकारी मित्रांना दक्षिण आशियाचा नायक म्हणता येईल. देशातील संपूर्ण जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे, असे क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या भगतसिंगांची आयडिया ऑफ इंडिया होती. सर्व प्रकारच्या कारागिरांना अद्ययावत प्रशिक्षण देऊन कौशल्य वृद्धी करून त्यांचे जीवन सुखकर केले पाहिजे, अशी भूमिका भगतसिंगांनी घेतली होती. लोकांच्या सहभागातून सातत्याने सामाजिक सुधारणा करीत राहणे आवश्यक आहे. नवभारत विषमतेच्या उतरंडीवर आधारलेला नसावा. वेगळ्या पातळीवरच्या राष्ट्रवादाचा विचार संकुचीत पद्धतीने न करता विशाल पद्धतीने करावा. यावेळी डॉ. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी तर नेहरू अभ्यास केंद्राच समन्वयक डॉ.रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

24 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# राष्ट्रीय चर्चासत्र आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (ता. २४) 'पं. नेहरुंची कल्याणकारी धोरणे व त्यांची अंमलबजावणी' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. डॉ. वासंती रासम यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार असून प्राचार्य आनंद मेणसे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी रमेश कोलवालकर उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रास उपस्थित रहावे, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2018
तरुण भारत

# विद्यापीठात आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे नेहरु अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता 'पंडित नेहरुंची कल्याणकारी धोरणे व त्यांची अंमलबजावणी" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे चर्चासत्र विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होईल. चर्चासत्राचे उद्घाटन डॉ.वासंती रासम यांचे हस्ते होणार आहे तर बीजभाषक म्हणून प्राचार्य आनंद मेणसे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अध्यक्षस्थान रमेश कोलवालकर भूषविणार आहेत. चर्चासत्राचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.प्रकाश पवार यांनी केले आहे.